## दिन विशेष...

१८६० : प्रजनन शास्त्रज्ञ हर्मन जे मलूर यांचा जन्म.
१८६० : लॉर्ड डलहौसीचा मृत्यू झाला.
१९०९ : देशभक्त कान्हेरे यांनी नाट्यगृहात कलेक्टर जॅक्सनचा खून केला.
१९५५ : आचार्य अत्रे यांच्या महात्मा ज्योतिबा फुले या चित्रपटास राष्ट्रपती रौप्यपदक प्राप्त झाले.

# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८४,९२९.३६ +४४७.५५ (०.५३%)
डॉलर ₹ ८९.५८

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १२ |
| दिल्ली | १९ | ११ |
| मुंबई | ३४ | १७ |
| नागपूर | २७ | ०८ |
| पुणे | २९ | ०७ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ४२ | किंमत : ५ रु. | पाने ४


## सुविचार

आयुष्यात मोठं बनायचं असेल, तर छोट्या गोष्टींमध्ये समाधान मानणं थांबवा.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०० संध्या-५:५२

## सोने - चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,३५,९९०/- २,१४,०००/-

## केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# बोगस मतदान, राडा अन् महिलांना डांबून ठेवल्याचे प्रकार

## राज्यात २३ ठिकाणी झाले मतदान पूर्ण

## आज मतमोजणीसह निकाल

वृत्तसंस्था । मुंबई

राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी शनिवारी (२० डिसेंबर २०२५) मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदान सुरू होते. अनेक ठिकाणी मतदारांच्या रांगा लागल्याने उशिरापर्यंत मतदान चालू राहिले. मात्र, अंबरनाथ, धर्माबादसह काही ठिकाणी बोगस मतदान, पैशांचे आमिष आणि राड्याच्या घटनांनी निवडणुकीला गालबोट लागले. रविवारी (२१ डिसेंबर) सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होऊन निकाल जाहीर होणार आहेत.



- धर्माबादमध्ये महिलांना मंदिर-मंगल कार्यालयात डांबले
- कोपरगावात गोंधळ, बारामतीत बोगस मतदान
- फुलंब्रीत जादूटोणा, सिन्नरमध्ये बोगस मतदार
- गडहिंग्लजमध्ये वाद

नांदेड जिल्ह्यातील धर्माबादमध्ये मोठा राडा झाला. पैशांचे आमिष दाखवून शेकडो महिलांना मंदिरात आणि इनानी मंगल कार्यालयात डांबून ठेवल्याचा आरोप झाला. प्रसादाच्या स्वरूपात ४००० रुपये देण्याचे सांगून कुंभार समाजातील महिलांना नजरकैदेत ठेवल्याचा दावा महिलांनी केला. तेलंगणातील मतदार आणून बोगस मतदान केल्याचा आरोपही करण्यात आला. बोगस मतदानाच्या संशयातून एका महिला आणि पुरुषाला मारहाण झाली. जमाव जमल्याने पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला. नंतर डांबून ठेवलेल्या महिलांची सुटका करण्यात आली. निवडणूक अधिकाऱ्यांनी मंगल कार्यालयाची (पान २ वर)

### अंबरनाथमध्ये बोगस मतदानाचा गदारोळ

अंबरनाथ नगरपरिषद निवडणुकीत सकाळीच खळबळ उडाली. भाजपने शिंदे गटाच्या शिवसेनेवर २०८ हून अधिक बोगस मतदार आणल्याचा आरोप केला. कोहोजगाव परिसरातील एका सभागृहात शेकडो महिला गोळा केल्याचा दावा करण्यात आला. या महिलांना बोगस मतदानासाठी आणल्याचा संशय आहे. पोलिसांनी या महिलांची चौकशी सुरू केली असून काही ठिकाणी तणाव निर्माण झाला. मातोश्री नगर परिसरात पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. तसेच, ईव्हीएम मशीन आणणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे बोगस ओळखपत्रे आढळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. पैशांचे वाटप आणि ईव्हीएममध्ये छेडछाड केल्याचेही आरोप झाले.

# आ.अनिल पाटील यांची मंत्रिमंडळात लागणार वर्णी?

- मंत्रिपदासाठी इच्छुक आमदारांच्या हालचाली झाल्या गतिमान





प्रतिनिधी । जळगाव

**माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वीकारल्यानंतर राज्यपालांनी त्यास मंजुरी दिली. त्यामुळे कोकाटे यांचा मंत्रिमंडळातील प्रवास अधिकृतरीत्या संपला आहे. कोकाटेंच्या राजीनाम्यानंतर मंत्रिमंडळात निर्माण झालेल्या रिक्त जागेमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मंत्रीपदासाठी इच्छुक आमदारांची धावपळ सुरू झाली आहे. अनेक आमदारांनी मुंबई तळ ठोकून आपली दावेदारी मजबूत करण्यासाठी लॉबिंग सुरू केल्याचे चित्र आहे.**

कोकाटे यांचा राजीनामा मंजूर झाल्यानंतर मंत्रिमंडळात निर्माण झालेल्या रिक्त जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीतील इच्छुकांमध्ये चांगलीच हालचाल सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर, अमळनेरचे आमदार अनिल भाईदास पाटील यांचे नावही पुढे आले आहे. पाटील यांना यापूर्वी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या महायुतीच्या मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले होते. त्यावेळी ते मुदत व पुनर्वसन मंत्री म्हणून कार्यरत होते. मात्र, त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या महायुतीच्या नव्या मंत्रिमंडळात अनिल पाटील यांच्या नावाचा मंत्रिपदासाठी पुन्हा विचार झाला नाही. यामुळे ते काहीसे नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. नाराजीतून त्यांनी मंत्री असताना मिळालेली सुरक्षा व्यवस्था देखील नाकारली होती. (पान २ वर)

कोकाटे यांच्या राजीनाम्यामुळे निर्माण झालेल्या संधीचा लाभ घेण्यासाठी आमदार अनिल पाटील यांनी पुन्हा एकदा प्रयत्नांना वेग दिल्याचे दिसून येत आहे. उत्तर महाराष्ट्राला मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व कमी असल्याचा मुद्दा तसेच मराठा समाजाचा प्रभावी चेहरा, या निकषांवर आपली दावेदारी मजबूत करण्याचा प्रयत्न पाटील गटाकडून सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अनिल पाटील समर्थकांकडून मुंबईत वरिष्ठ नेत्यांशी संपर्क वाढवण्यात आला असून, पक्षासह महायुतीच्या पातळीवर सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सध्या मंत्रिमंडळात उत्तर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व मर्यादित असल्याची भावना या भागातील नेत्यांमध्ये आहे. त्यामुळे कोकाटेंच्या रिक्त जागेवर उत्तर महाराष्ट्रातीलच चेहऱ्याला संधी द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार पाटील यांचे नाव महत्त्वाचे मानले जात आहे.

## थोडक्यात



### टँक टॉवर कोसळल्याने सहा मजुरांचा मृत्यू

नागपूर । जिल्ह्यातील बुटीबोरी एमआयडीसी परिसरात शुक्रवारी सकाळी एक भीषण औद्योगिक दुर्घटना घडली. येथील अवाडा कंपनीच्या प्रकल्पस्थळी उभारण्यात येत असलेला उंच टँक टॉवर अचानक कोसळल्याने सहा मजुरांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर नऊ कामगार जखमी झाले आहेत. यापैकी तीन जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण औद्योगिक परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

### परीक्षा केंद्रांमधील वर्गात सीसीटीव्ही बंधनकारक

मुंबई । इयत्ता दहावी बारावी परीक्षांचे केंद्र असलेल्या शाळांमधील प्रत्येक वर्गखोल्यांमध्ये आवश्यक असलेल्या भौतिक सुविधांबरोबरच सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी आवश्यक निधीबाबत कोणतीही स्पष्टता शिक्षण विभागाकडून देण्यात आलेली नाही. त्यामुळे शिक्षण विभागाच्या या निर्णयाला संस्थाचालकांसह शिक्षक संघटनांनी विरोध केला आहे. विविध उपक्रमासाठी शिक्षण विभागाकडून शाळांना निधी दिला जात नाही. त्यामुळे या आर्थिक भाराबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

# अवैध गर्भलिंग, गर्भपाताबाबत माहिती देणाऱ्यास १ लाखाचे बक्षीस

प्रतिनिधी । धुळे



**जिल्ह्यात अवैध गर्भलिंग निदान व गर्भपाताच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली असून, अशा बेकायदेशीर प्रकारांची माहिती देणाऱ्यास एक लाख रुपयांपर्यंत रोख बक्षीस देण्याची घोषणा करण्यात आली आहे. गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ (सुधारित २००३) याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त करत जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी हे जाहीर आवाहन केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात १८ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय पीसीपीएनडीटी दक्षता समितीच्या बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. जिल्हाधिकारी विसपुते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगांवकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, धुळे महानगरपालिकेच्या (पान २ वर)



# शालिनीताई पाटील यांचं निधन

वृत्तसंस्था । मुंबई

महाराष्ट्राच्या माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचं निधन झालं आहे. शालिनीताई या माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या पत्नी होत्या. ९४ वर्षीय शालिनीताई यांनी मुंबईतील माहीम येथील त्यांच्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही महिन्यांपासून शालिनीताई या आजारी होत्या. त्यांच्यावर उपचार सुरु होते. पण आज त्यांची प्राणज्योत मालवली. शालिनीताई यांच्या पार्थिवावर साताऱ्यातील कोरेगाव येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

# उन्हाळ्यात तापणारे जळगाव गारठले

- जिल्ह्यात गेल्या दोन-तीन दिवसांपासून कडाक्याच्या थंडीमुळे तापमानाचा पारा घसरला

प्रतिनिधी । जळगाव

**उन्हाळ्यात सुमारे ४५ अंशापर्यंत तापमान असणाऱ्या शहरासह जिल्ह्यात गेल्या दोन-तीन दिवसांपासून कडाक्याच्या थंडीमुळे तापमानाचा पारा घसरला आहे. अचानक थंडीची लाट परतल्याने जनजीवनावर विपरित झाला असताना, रब्बी पिकांसाठी ही थंडी पोषक मानली जात आहे. केळी बागांसाठी मात्र वाढती थंडी नुकसानकारक ठरण्याची भीती व्यक्त होत आहे.**

किमान तापमानाचा पारा १० अंशांच्या खाली आल्यास तसेच तापमानात सरासरीच्या तुलनेत ४.५ अंशांची घट झाल्यास थंडीची लाट आली, असे म्हटले जाते. तर तापमानात ६.५ अंशांपेक्षा अधिक घट झाल्यास तीव्र लाट आल्याचे समजले जाते. त्यानुसार, शनिवारी जळगावात सकाळी थंडीच्या तीव्र लाटेची स्थिती दिसून आली. जिल्ह्यातील तापमानात झालेली घट पुढील काही दिवस अशीच कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. उत्तर भारतात सक्रिय झालेल्या शीत (पान २ वर)

### थंडीचा केळी बागांवर अनिष्ट परिणाम



जळगाव जिल्ह्यात केळीची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. केळी पिकाची जोमदार वाढ आणि चांगल्या उत्पादनासाठी १६ ते ४० अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. तापमान १२ अंश सेल्सिअसच्या खाली गेल्यास त्याचा केळी पिकावर अनिष्ट परिणाम होतो. सध्याचे नीचांकी तापमान लक्षात घेता केळीच्या बागांना मोठा फटका थंडीमुळे बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वाढत्या थंडीमुळे केळीची वाढ खुंटण्यासह पानांवर करपासारख्या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची चिन्हे आहेत. आधीच केळीचा भाव कमी आहे. त्यातच अशा संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. कारण, थंडीचे प्रमाण असेच सतत राहिले तर केळी उत्पादनावर मोठा परिणाम होऊ शकतो.

# जळगाव-इंदूर अंतर चार तासांत कापता येणार

## इंदूर-हैदराबाद महामार्ग ठरेल उत्तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा कणा



प्रतिनिधी । जळगाव

कृषी व औद्योगिक विकासाला नवे बळ देऊ शकणाऱ्या इंदूर-हैदराबाद महामार्गाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. भारत माला परियोजनेच्या पहिल्या टप्प्याचा भाग असलेल्या आणि मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा या तीन राज्यांना जोडणाऱ्या या महामार्गासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपये निधी मंजूर आहे. या प्रकल्पामुळे जळगाव येथून अवघ्या काही तासांत इंदूर आणि हैदराबादला पोहोचणे शक्य होणार आहे.

इंदूर-हैदराबाद हा संपूर्ण महामार्ग इंदूरमधील तेजाजीनगर येथून सुरू होईल. त्यानंतर खरगोन, बलवाडा, धनगाव, बोरगाव, बऱ्हाणपूर आणि इच्छापूर या मध्य प्रदेशातील महत्त्वाच्या भागांतून मार्गक्रमण करेल. पुढे हा मार्ग महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तसेच अकोला, नांदेडमार्गे तेलंगणातील हैदराबादपर्यंत पोहोचणार आहे. हा महामार्ग कार्यान्वित झाल्यानंतर इंदूर आणि हैदराबादमधील अंतर सुमारे १५० किलोमीटरने कमी होणार आहे. १४ ते १५ तासांच्या प्रवासाचा कालावधी आठ ते नऊ तासांत पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्रस्तावित महामार्ग बऱ्हाणपूर शहरात प्रवेश करणार नाही. तो शाहपूरकडे जैनाबाद फतेह जवळील दर्यापूरमार्गे बसद रोडच्या पलीकडे नेपानगरला जाईल. यामुळे मोठ्या वाहनांना शहरात प्रवेश करण्यापासून रोखले जाईल. महामार्गासाठी दोन मोठे पूल बांधले जातील. त्यापैकी एक तापी नदीवर आणि (पान २ वर)

### महामार्गाच्या कामांची सद्यःस्थिती ?

इंदूर – हैदराबाद महामार्ग पूर्ण झाल्यानंतर मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि तेलंगना राज्यांतील व्यापार, पर्यटन आणि उद्योग क्षेत्राला नवी दिशा मिळणार आहे. राष्ट्रीय महामार्गांच्या जाळ्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातून जात असलेल्या या महामार्गाचे बरेच काम सध्या प्रगतीपथावर आहे. उत्तर महाराष्ट्रातून मध्य प्रदेशातील इंदूर, उज्जैन, ओंकारेश्वर तसेच तेलंगनातील हैदराबादला जाण्यासाठी इंदूर-उज्जैन हा महामार्ग खूपच सोयीचा ठरेल. मध्य प्रदेश, महाराष्ट्रात या महामार्गाचे बांधकाम जवळपास ७० ते ८० टक्के पूर्ण झाले आहे. अनेक संरचनात्मक कामे पूर्णत्वाच्या मार्गावर देखील आहेत.

# भाषेला 'सक्ती' केली की विरोधाच्या प्रतिक्रिया उमटणारच!

- ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक दामोदर मावजो यांचे मत

वृत्तसंस्था । छ.संभाजीनगर

कोणत्याही भाषेला समृद्धपण येते ते अन्य भाषांमधील शब्दांचा स्वीकार करण्यातून. कोणत्याही प्रकारची सक्ती केली की विरोधाची प्रतिक्रिया उमटत असते. महाराष्ट्रातही हिंदीला विरोध होण्यामागे 'सक्ती' हा प्रकार असू शकतो. त्यासाठी कुठल्याही एका भाषेची सक्ती नको, असे स्पष्ट मत ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ कोंकणी साहित्यिक दामोदर मावजो यांनी मांडले. साहित्य हे साहित्यच असते, त्यात ग्रामीण, दलित, असं काही नसतं, त्याचे वर्गीकरण समीक्षकांना करू द्यावे, असेही ते म्हणाले.

देशात भाषांची विविधता आहे. भाषा-भाषांमध्ये नाही तर भाषावादींत वैर असते. काहींना भाषांमध्ये वाद हवा असतो. गोव्यात मराठी-कोंकणी भाषेत कुठलाही वाद नाही, असे सांगत मावजो म्हणाले, कोणाला मान्य असो अथवा नसो, (पान २ वर)

- हिंदू समाजाचे प्रश्न जसे साहित्यातून मांडले जात आहेत, तसे ख्रिश्चन, मुस्लिम समुदायाचे प्रश्न प्रतिबिंबित होत नाहीत. रायटर इज फायटर असे म्हटले जाते, असे सांगत त्यांनी आपल्या विवेक बुद्धीला पटते ते लिहितो तो लेखक, विवेक बुद्धीला मुरड घालून लिहितो त्याला लेखक कसे म्हणावे ? असा प्रश्न उपस्थित करून लेखकांना पुरस्कार नाकारण्याचा अधिकार आहे, तर साहित्य अकादमीच्या समितीला पुरस्कारासाठी निवड करण्याचाही अधिकार असतो हेही समजून घेतले पाहिजे, असेही ते यावेळी म्हणाले.

## थोडक्यात

### रोटरीतर्फे आज विनामूल्य वैद्यकीय शिबीर

**जळगाव ।** येथील रोटरी क्लब जळगावतर्फे स्व.डॉ.विश्वनाथ रतन पाटील यांच्या स्मरणार्थ रविवार दि.२१ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत अंजनविहिरे (ता.धरणगाव) येथील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत विनामूल्य वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मेडिकल कमिटी चेअरमन डॉ. जयंत जहागिरदार, प्रोजेक्ट को-चेअरमन राकेश चव्हाण यांनी दिली. शिबिरात विविध तज्ञ डॉक्टर्स महिला व पुरुषांची जनरल तपासणी, बीपी, शुगर, दात, सांधे, हाडे, डोळे, कर्करोग तसेच स्त्रीरोग व बालकांची तपासणी करणार येणार आहे. परिसरातील विविध गावातील व्यक्तींनी शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर यांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांनी केली मतदान जनजागृती



**जळगाव ।** श्री संत ज्ञानेश्वर विद्यालयातील माध्यमिक विभागातर्फे संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त मतदार जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना मतदानाचा हक्क, जबाबदारी आणि लोकशाहीतील सहभागाचे महत्त्व याबाबत उपशिक्षिका रूपाली आव्हाड व मुख्याध्यापक मुकेश नाईक यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी 'मतदान करा, लोकशाही बळकट करा' या संदेशासह घोषवाक्ये, फलक व प्रतिज्ञा घेत मतदार जनजागृती केली.

# भाजप-शिवसेनेसोबत महायुती करूनच निवडणूक लढविणार : आ.अनिल पाटील

## ● ३५ ते ४० जागांची करणार मागणी; पत्रकार परिषदेत दिली माहिती

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणुक राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) महायुती म्हणून भाजप-शिवसेनेसोबतच महायुती करूनच लढविणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री आ.अनिल पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री गुलाबराव देवकर, जिल्हा चेअरमन संजय पवार, माजी आमदार मनिष जैन, महिला आघाडीच्या प्रतिभा शिंदे, जिल्हाध्यक्ष अभिषेक पाटील, रविंद्र पाटील आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना आ.अनिल पाटील यांनी, राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे १९ प्रभागात उमेदवारांनी लढण्याची तयारी दर्शविली आहे. जो उमेदवार निवडून येण्यास सक्षम आहे, अशानांच आम्ही उमेदवारी देणार आहे. राज्यस्तरावरूच महायूतीद्वारे महापालिका लढविण्याचे आदेश आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.




**■ पालिका निवडणूकीच्या निकालानंतरच निर्णय...**

गेल्या दोन दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे इच्छूकांकडून अर्ज मागविण्यात आले होते. आतापर्यंत १९ प्रभागातून ७९ उमेदवारांचे अर्ज आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. जागा वाटपाबाबत भाजप-शिवसेनेच्या नेत्यांशी प्राथमिक बोलणी झाली आहे. त्यात पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार मंगेश चव्हाण, आमदार राजूमामा भोळे यांच्याशी बोलणे झाले आहे. त्यांनी पालिका निवडणूकीच्या निकालानंतर आम्ही तिघा पक्षांचे नेते बसू व जागा वाटपाचा निर्णय घेवू असे सांगण्यात आले आहे. जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांच्याशी बोलणे झालेले नाही. तेही लवकरच होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**■ ३५ ते ४० जागांची मागणी करणार...**

जागा वाटपाबाबत भाजपच्या नेत्यांशी प्राथमिक बोलणी झाली आहे. मात्र, त्याबाबतचा अंतीम निर्णय २३ डिसेंबरला होणाऱ्या बैठकीत होणार आहे. त्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस ३५ ते ४० जागांची मागणी करणार आहे. राष्ट्रवादी कांग्रेसचे प्रदेशाध्यक्ष यांच्या सूचनेनूसारच महायुतीद्वारे आम्ही जळगाव महापालिका निवडणूक लढणार आहोत, असे सांगून भाजप आम्हाला सन्मानजनक जागा देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आम्ही निवडून येणारे सक्षम उमेदवार उभे करू, असेही ते यावेळी म्हणाले.

# उद्योजकावर हल्ला करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करा!

## ● युवासेनेची निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी । जळगाव

**उद्योजकाची कार अडवून त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी युवासेनेतर्फे करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन नुकतेच उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांना देण्यात आले.**

युवासेनेने दिलेल्या निवेदनात, उद्योजक संजय रामगोपाल तापडिया हे बुधवारी रात्री रात्री ९.३० वाजता कंपनीतून घरी परतत असताना अज्ञात रिक्षाचालकाने त्यांच्या कारचा (एम.एच.१९, ई.पी.१८१०) पाठलाग केला. हे लक्षात आल्याने तापडीया यांनी रस्ता बदलवला, तरी रिक्षाचालकाने त्यांच्या कारला अडवून रिक्षेतील चार ते पाच जणांनी त्यांना लाथांनी मारहाण केली. त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस टणक वस्तूने मारहाण केल्याने तीन टाके पडले आहेत. याबाबत गुरुवारी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात हल्लेखोराविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नमुद करण्यात आले आहे. उद्योजकावर झालेल्या हल्ल्यातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी देखील या निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी युवासेनेचे विभागीय सचिव विराज कावडीया, कॉलेज कक्ष जळगाव लोकसभा प्रमुख प्रीतम शिंदे, गौरव चंदनकर, खुशाल शर्मा, आकिब शेख, कार्तिक खैरनार, ओम खचणे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



**■ तापडीयांची घेतली भेट**

निवेदन दिल्यानंतर युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी संजय तापडिया यांची त्यांच्या निवास्थानी भेट घेतली. यावेळी माजी मंत्री सुरेशदादा जैन, संपर्क प्रमुख संजय सावंत यांनी दूरध्वनीद्वारे तापडिया यांच्याशी चर्चा केली.

# संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त झांबरे शाळेत विद्यार्थ्यांचे श्रमदान



प्रतिनिधी । जळगाव

**ए.टी. झांबरे माध्यमिक विद्यालयात संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त शाळा परिसरात श्रमदान करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपक्रमास मुख्याध्यापिका प्रणिता झांबरे, पर्यवेक्षक नरेंद्र पालवे, दिगंबर पाटील, वर्षा चौधरी, पुनम कोल्हे, निर्मल चतुर, दिपाली खडके उपस्थित होते. यावेळी शाळेच्या मैदानासह परिसरात विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. रोहिणी पाटील, विवेक मोरे व किशोर भोई यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. हातात झाडू घेऊन स्वच्छता करताना विद्यार्थ्यांनी 'स्वच्छता ही सेवा आहे' हा संदेश कृतीतून अधोरेखित केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.कोळी यांनी केले.

# पोदार प्रेपमधील 'विंटर वंडरलँड'चा विद्यार्थ्यांनी घेतला आनंद

## ● विद्यार्थ्यांसोबत मित्र, कुटुंबीय व पालकही झाले होते सहभागी

प्रतिनिधी । जळगाव

**येथील पोदार प्रेपमध्ये शनिवार, दि.२० रोजी 'विंटर वंडरलँड मेरी, ब्राईट अ‍ॅण्ड फुल ऑफ डिलाइट' या थीमवर आधारित आनंददायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांसह त्यांचे मित्र, कुटुंबीय व पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला.**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी म्हणून पोदार प्रेपमध्ये विविध उपक्रम राबविले जातात. शनिवार, दि.२० रोजी देखील 'विंटर वंडरलँड मेरी, ब्राईट अ‍ॅण्ड फुल ऑफ डिलाइट' या थीमवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हिवाळ्याच्या आल्हाददायक वातावरणात साजरा करण्यात आलेला हा कार्यक्रम केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा ठरला. राष्ट्रीय अभ्यासक्रम चौकट अंतर्गत पंचकोश संकल्पनेशी निगडित उपक्रम राबविण्यात आले. यामधून विद्यार्थ्यांच्या मनोमय कोश, आनंदमय कोश व विज्ञानमय कोश यांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान हिवाळ्यातील कपडे ओळखणे, घंटा न वाजवता आव्हान पूर्ण करणे, ख्रिसमस ट्री सजावट, फोटो फ्रेम तयार करणे, टॉस द रिंग्स, ड्रेस मी अप अशा विविध शैक्षणिक व मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रंगीबेरंगी कपड्यांत सजलेले विद्यार्थी या उपक्रमात अतिशय उत्साहाने सहभागी झाले होते.





**■ अशा उपक्रमांमुळे आत्मविश्वास वाढीस लागतो : प्राचार्य गोकुळ महाजन**

या वेळी बोलतांना प्राचार्य गोकुळ महाजन म्हणाले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद, सर्जनशीलता, सामाजिक कौशल्ये व आत्मविश्वास वाढीस लागतो. पालक व मित्रांसोबत सहभाग घेतल्याने मुलांचा भावनिक विकासही घडतो. विंटर वंडरलँड उपक्रमामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंद, उत्साह आणि उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते, असेही ते यावेळी म्हणाले.

## पान १ वरुन

### उन्हाळ्यात तापणारे......

लहरींचा प्रभाव जिल्ह्यातही जाणवू लागल्याने मध्यंतरी काहीसा ओसरलेला थंडीचा जोर पुन्हा वाढला आहे. पहाटेपासूनच अंगाला झोंबणारे थंड वारे वाहत असल्याने नागरिकांना तीव्र थंडीचा सामना करावा लागत आहे. रात्री पुरती मर्यादित असलेली थंडी आता दिवसभर जाणवत असल्याने त्याचा जन जीवनावरही परिणाम जाणवत आहे. दरम्यान, थंडीपासून बचाव करण्यासाठी जिल्ह्यातील अनेक भागांत नागरिक सकाळी आणि सायंकाळी शेकोट्यांचा आधार घेताना दिसत आहेत. ग्रामीण व शहरी भागातही थंडीपासून बचावासाठी गरम कपडे, मफलर, टोपी यांचा वापर वाढला आहे. वेधशाळेच्या माहितीनुसार, थंडीची लाट आणखी दोन ते तीन दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. जळगावात शुक्रवारी किमान तापमान ७.५ अंश सेल्सिअसवर नोंदविण्यात आले होते. मात्र, शनिवारी त्यात दीड अंशांची घसरण होऊन किमान तापमान ६.० अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले

### आ.अनिल पाटील यांची......

कोकाटेंच्या रिक्त जागेसाठी अनेक इच्छुक मैदानात उतरल्याने महायुतीच्या नेतृत्वासमोर निर्णय घेण्याचे आव्हान उभे राहिले आहे. प्रादेशिक समतोल, सामाजिक समीकरणे, पक्षांतर्गत निष्ठा आणि आगामी राजकीय गणिते लक्षात घेऊन अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. कोकाटेंच्या जागेवर कोणाची वर्णी लागते, याकडे उत्तर महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. याच दरम्यान, माजी मंत्री धनंजय मुंडे यांनीही कोकाटे यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या मंत्रिपदासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. कोकाटेंचा राजीनामा मंजूर होताच मुंडे यांनी तातडीने दिल्ली गाठत भाजपचे ज्येष्ठ नेते आणि देशाचे गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. मुंडे यांनी यापूर्वी राज्य मंत्रिमंडळात महत्त्वाची जबाबदारी सांभाळली असून, पुन्हा एकदा मंत्रिमंडळात कमबॅक करण्यासाठी ते जोरदार प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

### अवैध गर्भलिंग, गर्भपाताबाबत......

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संपदा कुलकर्णी, पीसीपीएनडीटी विधी समुपदेशक अ‍ॅड. मिरा माळी यांच्यासह सर्व तालुका वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, मनपाचे झोनल अधिकारी आणि समितीचे सदस्य उपस्थित होते. बैठकीत जिल्हाधिकारी विसपुते यांनी धुळे जिल्ह्यात मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सर्व तालुक्यांमध्ये आशा वर्कर व आरोग्य सेविकांच्या माध्यमातून एएनसी ट्रॅकिंग अधिक काटेकोरपणे राबवून गर्भवती मातांचा नियमित अहवाल सादर करण्याचे आदेश तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आले. गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर लक्ष ठेवून कोणताही संशयास्पद प्रकार तात्काळ वरिष्ठांना कळविण्याचे निर्देशही देण्यात आले.

### बोगस मतदान, राडा......

पाहणी केली असता गैरप्रकार आढळला नाही, असे सांगितले. गडहिंग्लजमध्ये वाद - कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लजच्या एमआर हायस्कूल मतदान केंद्रावर राडा झाला. गोकुळचे चेअरमन नावेद मुश्रीफ यांना मतदान केंद्रात सोडल्याने विरोधकांनी आक्षेप घेतला. दोन्ही गटांमध्ये बाचाबाची होऊन तणाव निर्माण झाला. पोलिसांनी हस्तक्षेप करून वाद मिटवला. कोपरगावात गोंधळ, बारामतीत बोगस मतदान - कोपरगावमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी उमेदवारांमध्ये बाचाबाची झाली. मतदारांवर प्रभाव टाकल्याचे आरोप झाले.

### भाषेला 'सक्ती' केली ......

लिहिण्याचे काम आपण करतो आहोत. मला लिखानाची कधीच भीती वाटली नाही. गौरी लंकेश यांच्या हत्येनंतर दैनिकांमध्ये लिहिलेल्या इंग्रजी लेखांचे संकलन 'इंक ऑफ डिसेंट' या पुस्तक रुपात समोर आले. तेव्हा आपल्याला पोलीस संरक्षण देण्यात आले. त्याचे गोव्यातील नागरिकांना आश्चर्य वाटले होते.

### जळगाव-इंदूर अंतर......

दुसरा पूल मोहना नदीच्या पुलावर असेल.वाहतुकीतील अडथळे आणि अपघातांचे प्रमाण झाल्याचा थेट फायदा प्रवासी वाहतूक तसेच माल वाहतुकीला भविष्यात होऊ शकणार आहे. इंदूर, खरगोन, खंडवा, बऱ्हाणपुरसह महाराष्ट्रातील जळगाव आणि इतर जिल्ह्यांतील कृषी व औद्योगिक उत्पादने, निर्यातक्षम वस्तूंच्या वाहतुकीला मोठी चालना मिळेल. मध्य प्रदेश, उत्तर महाराष्ट्र आणि तेलंगणा या भागांमध्ये नवीन औद्योगिक वसाहती, गोदामे, लॉजिस्टिक पार्क्स आणि सेवा उद्योग उभारण्यास देखील अनुकूल वातावरण निर्माण होणार आहे. परिणामी, स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे. इंदूर- हैदराबाद महामार्ग मध्य भारताच्या सर्वांगीण विकासाचा कणा ठरेल.

# डेप्युटी सीईओ एम.टी.चौधरी रुजू; कर्मचाऱ्यांतर्फे स्वागत



प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी एम.टी. चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली असून ते नुकतेच रुजू झाले. दरम्यान, ते रुजू झाल्यानंतर कास्ट्राईब कर्मचारी संघटनेतर्फे संविधानाची प्रत देऊन त्यांचे स्वागत करण्यात आला.**

यावेळी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल सुरडकर, जिल्हाध्यक्ष आर.टी. सोनवणे, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल पगारे, जिल्हा उपाध्यक्ष अरुण बागुल, उपाध्यक्ष बी.एस. शिरसाठ, उपाध्यक्ष नारायण तुपकर, स्वीय सहाय्यक किरण लाडवंजारी, अतिरिक्त सरचिटणीस जयवंत सावंदे, जिल्हा संघटक बुद्धभुषण सपकाळे, जिल्हा संघटक प्रशांत सोनवणे, जिल्हा सदस्य राकेश शिसोदे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# विचार वारसा फाउंडेशनच्या दिनदर्शिकेचे मान्यवरांच्याहस्ते प्रकाशन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील मेहरूण परिसरातील रामेश्वर कॉलनी परिसरात सामाजिक क्षेत्रातील विचार वारसा फाउंडेशनतर्फे वार्षिक दिनदर्शिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी गोरगरीब, दुर्बल घटकांसाठी नवीन वर्षात प्रबोधनात्मक उपक्रम घेण्यात येतील अशी माहिती संस्थापक अध्यक्ष विशाल देशमुख यांनी दिली.**



विचार वारसा फाउंडेशनने मेहरूण परिसरातील अनेक भागांमध्ये सामाजिक कार्य करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही वार्षिक दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली असून त्याचे प्रकाशन माजी मंत्री गुलाबराव देवकर, आ. अनिल पाटील, माजी आ. मनीष जैन, महिला आघाडीच्या प्रतिभा शिंदे, जिल्हा बँकेचे संचालक संजय पवार, आभिषेक पाटील, अशोक पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मेहरूण परिसरात अनेक गोरगरीब कुटुंबीय राहतात. पुढील वर्षी २०२६ साली त्यांच्यासाठी विविध प्रबोधनात्मक उपक्रम घेण्याचा मानस यावेळी संस्थापक अध्यक्ष विशाल देशमुख यांनी बोलून दाखविला.

# सातत्य, सकारात्मक विचार, सजगता हेच निरोगी जीवनाचे गमक

## ● रोटरीच्या महिला समितीच्यावतीने आयोजित संवाद सत्रातील सूर

प्रतिनिधी । जळगाव

**सातत्य, सकारात्मक विचार व सजगता हेच निरोगी जीवनाचे गमक आहे असे रोटरी क्लब जळगावच्या निरोगी जीवन व सवयी विषयावरील संवादातील सहभागी महिला सदस्यांनी केले.**




रोटरीच्या रोग प्रतिबंध व उपचार महिन्यांतर्गत महिला समितीच्यावतीने आयोजित विशेष सभेत त्या बोलत होत्या. यात रोटरी परिवारातील सदस्य माजी अध्यक्ष डॉ.सुमन लोढा, सेवानिवृत्त उपप्राचार्य पूनम मानुधने व स्वाती ढाके यांनी सहभाग नोंदवला.संवादाचे संचालन आदिती कुळकर्णी यांनी केले. याप्रसंगी क्लबचे अध्यक्ष गिरीश कुळकर्णी व मानद सचिव सुभाष अमळनेरकर यांची उपस्थिती होती. तीनही मान्यवर सदस्यांनी आपापल्या जीवनप्रवासातून एकच गोष्ट ठामपणे सांगितली की निरोगी जीवनासाठी आपण स्वतःसाठी वेळ काढला पाहिजे. त्यासाठी कौटुंबिक जबाबदारी पार पाडतांना परिवार सदस्यांचे सहकार्य घ्यावे. वेळेचे नियोजन करुन स्वतः साठी किमान तास दिड तास वेळ काढावा. चांगल्या मित्रांचा सहवास मानसिक स्वास्थ्यासाठी आवश्यक आहे. सर्वांनी आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे लक्ष द्यावे. योगा, प्राणायामाने बाह्य सौंदर्यासोबत अंतर्गत सौंदर्य खुलते. शरीरात निर्माण झालेल्या कॅलरी श्रमाने वापरल्या जाव्यात. महिला बहुतेकदा ॲनिमिक असतात. त्यांनी आहाराकडे विशेष लक्ष देण्याची गरज प्रतिपादित केली. आहारात सर्व प्रकारच्या स्वादाचा समावेश असावा. मात्र ते प्रमाणात असावे. नियमित व्यायाम व सूर्यनमस्काराने लाभ होतो असेही त्यांनी सांगितले

आजार झाल्यावर उपचार करणे महत्त्वाचेच आहे, मात्र त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे आजार होऊच नयेत यासाठी जीवनशैलीत बदल करणे हेच सर्वांचे सांगणे होते. आपल्या दैनंदिन जीवनात निरोगी जीवनासाठीच संकल्प उतरवण्याचे त्यांनी आवाहन केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# धुळ्यात भाजप वकील आघाडीला शंभर वकिलांचे बळ

**प्रतिनिधी । धुळे**



धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार रावल, धुळे शहराचे आ. अनुप अग्रवाल, तसेच भाजप धुळे महानगरचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ललित माळी व ॲड. जगदिश माळी यांच्या नेतृत्वाखाली एकाच वेळी तब्बल १०० वकिलांनी भाजप वकिल आघाडीमध्ये जाहीर प्रवेश केला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून, राष्ट्रहित व कायद्याच्या मार्गाने समाजसेवेचा संकल्प करत हा भव्य प्रवेश सोहळा पार पडला. या कार्यक्रमात ॲड. जगदिश माळी यापूर्वीच भाजप पक्षात कार्यरत असून सध्या भाजप वकिल आघाडी, धुळे महानगरचे उपाध्यक्ष आहेत, यांच्या नेतृत्वाखाली हा ऐतिहासिक प्रवेश घडून आला. उल्लेखनीय बाब म्हणजे, भाजप वकिल आघाडीचे उपाध्यक्ष पद स्वीकारण्यापूर्वी ॲड. जगदिश माळी यांनी शिवविधी व न्यायसेना शिवसेना (उबाठा) गटाचे मा. जिल्हाध्यक्ष म्हणून प्रभावी कार्य केले होते. । प्रवेशामध्ये शिवविधी न्यायसेना शिवसेना (उबाठा) गटाचे ३५ सदस्य व प्रमुख पदाधिकारी, तसेच इतर ६५ वकिलांनी भाजप वकिल आघाडीत प्रवेश करून एकूण १०० वकिलांचा विक्रमी सहभाग नोंदविला. धुळे शहराच्या राजकीय इतिहासात प्रथमच एकाच वेळी १०० वकिलांचा संघटित राजकीय प्रवेश झाल्याने हा सोहळा ऐतिहासिक ठरला आहे. या भव्य कार्यक्रमासाठी ललित माळी व ॲड. जगदिश माळी यांनी आ. अनुप अग्रवाल व जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने परिश्रम घेतले.

या प्रसंगी ॲड.सी.व्ही. जावळे (अध्यक्ष, भाजप वकिल आघाडी) यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच ॲड. बळीराम वाघ, ॲड. मुकुंद माळी, ॲड. प्रमोदगावडे, ॲड. नितीन गवळी, ॲड. ललित महाले, ॲड. मधुमती ठाणगे, ॲड. सतिष मुसळे, ॲड. संदिप खैरनार, ॲड. रविंद्र गोपाळ, ॲड. सारीखा वाघ, ॲड. सुप्रभा ठाणगे, ॲड. भाग्यवंती सरोदे, ॲड. हर्षदा पवार, ॲड. नित्यानंद महाले, ॲड. दिनकर सोनवणे, ॲड. पंढरीनाथ पाटील, ॲड. दिनानाथ बडगुजर आणि ॲड. गणेश वाघ आदी वकिलांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. प्रवेश घेतलेल्या सर्व वकिलांनी भाजप पक्षासाठी एकदिलाने काम करून आगामी धुळे महापालिका निवडणुकीत पक्षाला दैदीप्यमान यश मिळवून देण्याचा निर्धार, तसेच कायदा विभाग मजबूत करत संघटनात्मक बांधणी करण्याचे आधासन दिले.

# सातपुड्याच्या कुशीतील डाब व वालंबा परिसरात दवबिंदू गोठले




**प्रतिनिधी । मोलगी**

**डाब परिसरात थंडीचा जोर वाढला असुन तापमानाचा पारा खालावला आहे. त्यामुळे शुक्रवारी पहाटेच्या सुमारास डाब वालंबा येथील नदीच्या परिसरात ठिक ठिकाणी गवतावर दव बिंदु गोठून गवतावर बर्फाची चादर पसरल्याचे दिसले.**

साधारणपणे जानेवारी महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सातपुड्याच्या डाब परिसरात दव बिंदू गोठतात मात्र या वर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कडाक्याची थंडी पडल्याने सुमारे दोन आठवडे आधीच दवबिंदु गोठल्याने परिसरातील गवतावर बर्फाची चादर पसरली. ठिक ठिकाणी वाहनांच्या टपावर देखील बर्फ साचल्याचे दिसुन आले. एरव्ही तापमान ४ अंशा पेक्षा कमी राहिल्यास दव बिंदू गोठण्याची प्रक्रिया सुरु होते. असे हवामान तज्ञांनी सांगितले.सातपुड्याच्या कुशीत वालंबा डाब या ठिकाणी दरवर्षी किमान एक वेळा तरी तापमान ४ अंशा पक्षा खाली जाऊन दव बिंदू गोठतात असे हवामान तज्ञांचे म्हणणे आहे.

## थोडक्यात

### भूकंप संशोधनावर कार्यशाळा

**धुळे ।** तालुक्यातील नगाव येथील गंगामाई अभियांत्रिकी महाविद्यालयात संशोधन नागरी (स्ट्रक्चरल) अभियंता डॉ. किशोर जैस्वाल यांच्या उपस्थितीत भूकंप संशोधनावर कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य शैलेंद्र दुबे होते. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. डॉ. जी. एम. पोद्दार व उपप्राचार्य प्रा. डॉ. बी. आर. मांडरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी डॉ. जैस्वाल यांनी भूकंपामुळे होणाऱ्या मानवी हानी यासंदर्भात त्यांनी केलेल्या संशोधनातील अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.

### जिल्हास्तरीय संमेलनानिमित्त कथाकथन, काव्यवाचन स्पर्धा

**साक्री ।** आगामी काळात होणाऱ्या धुळे जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून साक्री तालुक्यातील इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी कथाकथन व काव्यवाचन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या साहित्यातील कौशल्याचे दर्शन घडवले. स्पर्धेचे उद्घाटन श्री छत्रपती शिवाजी वाचनालयाचे संचालक विजय भोसले यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. याप्रसंगी व्यासपीठावर वाचनालयाचे कार्यवाह प्रा. विनय शहा, प्रा. एल. जी. सोनवणे, पी. झेड. कुवर, प्रसिद्ध साहित्यिक डॉ. नरेंद्र खैरनार, कथालेखिका वृषाली खैरनार यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कथाकथन स्पर्धेसाठी प्रा. जहागीरदार साळुंखे व प्रा. प्रकाश साळुंखे यांनी जबाबदारी पार पाडली.

### मतदारांना आमिष दिल्यास होईल कारवाई

**धुळे ।** महापालिका निवडणुकीच्या काळात मतदारांना आमिष म्हणून साड्या, दारु यासह वेगवेगळे साहित्य वाटणाऱ्यांवर कारवाई होणार आहे. नागरिकांना असे प्रकार आढळल्यास त्यांनी तक्रारी कराव्यात, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी आयुक्त नितीन कापडणीस यांनी केले आहे. आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवावे. रोख रकमा जप्तीची कारवाई करावी. तसेच रोख व्यवहारावर लक्ष शहरातील सर्व बँकानी मोठ्या रोख व्यवहारांवर लक्ष ठेवावे. निवडणूक यंत्रणेशी समन्वय साधून आवश्यक अहवाल सादर करावा, असे आयुक्तांनी सांगितले. तसेच निवडणुकीच्या बँकांनी कामासाठी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करावे, अशी मागणी आयुक्तांनी केली. निवडणूक खर्चाशी संबंधित व्यवहारांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे, अशा सुचना करण्यात आल्यात.

# रोहिणी–खंबाळे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे; ग्रामस्थांचा संताप

**प्रतिनिधी । बोराडी**

**गेल्या अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर रोहिणी–खंबाळे रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले खरे, मात्र हे काम ग्रामस्थांच्या डोळ्यांत धूळ फेकणारे ठरत आहे. संबंधित ठेकेदाराकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असून, डामराचा तर नावापुरताही वापर केला जात नसल्याचा गंभीर आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. हे रस्त्याचे काम आहे की केवळ मलमपट्टी? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, रस्त्याच्या दुरुस्तीसाठी जे डामर वापरणे बंधनकारक आहे, त्याचे प्रमाण अतिशय अल्प आहे. खडीवर केवळ डामराचा शिडकावा करून काम उरकले जात असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे हा रस्ता पहिल्याच पावसात वाहून जाण्याची भीती व्यक्त होत आहे. शासकीय निधीचा असा उघड अपव्यय होत असताना संबंधित विभागाचे अधिकारी नेमकं काय करत आहेत, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

रस्त्याच्या कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तातडीने चौकशी व्हावी. कामात वापरल्या जाणाऱ्या साहित्याची प्रयोगशाळेत तपासणी करावी, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली असून संबंधीत विभागाने पाहणी करीत तत्काळ दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

### काम बंद आंदोलनाचा दिला इशारा

रस्त्याच्या कामात पारदर्शकता नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष आहे. आम्हाला अनेक वर्षे खराब रस्त्याचा त्रास सहन करावा लागला, आता कुठे काम सुरू झाले तर तेही इतक्या हलक्या दर्जाचे होत आहे. ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे रस्ता पुन्हा महिनाभरात उखडणार असेल, तर अशा कामाचा उपयोग काय? असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे. जोपर्यंत कामाचा दर्जा सुधारत नाही, तोपर्यंत काम थांबवण्यात यावे. जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर निकृष्ट काम बंद पाडून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा रोहिणी आणि खंबाळे येथील ग्रामस्थांनी दिला आहे.





# धुळे येथे निर्माण झालेले अतिक्रमण उद्ध्वस्त करा: हिंदू समाजाची मागणी

**प्रतिनिधी । धुळे**

**शहर हे सद्यस्थितीत भारतातील विकसनशील धुळे शहर आहे. या शहराचा सर्वांगीण विकास होत आहे. परंतु याच कारणामुळे धुळे शहर व त्याच्या आसपासच्या परिसरात इतर शहरातून अनेक नवनवीन नागरिक हे स्थायिक होत आहेत. परंतु याच कारणामुळे धुळे शहरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न व बेकायदेशीर अतिक्रमणाचा पश्न निर्माण झाला आहे.**

➢ सकल हिंदू समाज आक्रमक झालेला असून जिल्हाधिकाऱ्यांना व महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन देऊन लवकरात लवकर अतिक्रमण मुक्त धुळे शहर करा व उपरोक्त नमुद जेल प्रशासनाच्या जागेवरील अतिक्रमण व एल. एम. सरदार शाळे लगतेच सुशिलनाल्यावरील जनकल्याण व नागरीक कल्याण व शहाराचा विकास या दृष्टीकोणातुन लवकरात लवकर नष्ट करावे व धुळे शहराला या विळख्यातुन मुक्त करावे. अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच तर निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन कारवाई न केल्यास सकल हिंदू समाजातर्फे जन आंदोलन उभे करण्याचा येईल असा इशारा देण्यात आला आहे व पुढील परीणामास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहिल असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी निखिल भावसार, गोपाल पाटील, योगेश पाटील, निलेश रुणवाल, शेखर मराठे सह समस्त हिंदू समाजातील नागरिक उपस्थित होते.

त्यानुसार देवपूरातील विटाभट्टी परिसरात जेल प्रशासनाच्या मालकीची मोठ्या स्वरूपाची सरकारी जागा अस्तित्वात आहे. परंतु सदर जागेवर एका विशिष्ट धर्माच्या लोकांनी बळजबरीने सदर जमीन हडप करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर अतिक्रमण केलेले आहे. सदर जागा अतिक्रमण मुक्त झाल्यास सद्यास्थितीत जेल हे त्या जागेवर विस्थापित करता येवू शकते व सद्यास्थितीत जेलची जागा ही शहरातील मध्यवर्ती ठिकाणावर असल्याने तिचा उपयोग जनकल्याण व नागरिकांच्या कल्याण हेतूने होवू शकतो.

परंतु त्याकरिता विटाभट्टी परिसरातील जेल प्रशासनाच्या जागेवरील बेकायदेशीर अतिक्रमण मुक्त झाल्यास जेल हे त्या जागेवर विस्थापित करता येवू शकते व सद्यास्थितीत जेलची जागा ही शहरातील मध्यवर्ती ठिकाणावर जागा असल्याने तिचा उपयोग जनकल्याण व नागरिकांच्या कल्याण हेतूने होवू शकतो. परंतु त्याकरिता विटाभट्टी परिसगतील जेल प्रशासनाच्या जागेवरील बेकायदेशीर अतिक्रमण निर्मूलन करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे देवपुरातील एलएम सरदार या शाळेत लागुन सुशिल नाला हा वाहत आहे. सदरील नाला हा धुळे शहरातील अतिरिक्त सांडपाणी शहराबाहेर नेण्याचा महत्वाचा मार्ग आहे. परंतु गेल्या काही वर्षापासून एलएम सरदार शाळेला लागुन असलेल्या परिसरातील काही प्रवृत्तीच्या लोकांनी सदर जागा हडप करण्याचे गैरकृत्य केलेले आहे.

# स्कॉर्पिओची दुचाकीला जोरदार धडक

## अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी

**प्रतिनिधी । धुळे**

**शहरातील देवपूर भागातील नगावबारी शिवारात मागून भरधाव येणाऱ्या स्कॉर्पिओने दुचाकीला उडविले. त्यात दुचाकीस्वार हॉटेल चालक ठार झाला. तर मागे बसलेला मजुर जखमी झाला. हा अपघात काल दि. १७रोजी मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास झाला.**

जितेंद्र काशिनाथ पारखे (वय ४८ रा. राष्ट्रवादी भवनजवळ, मिल परिसर, धुळे) असे मयताचे नाव आहे. त्यांचे नंदाणे येथे मामा–भांजे नावाचे हॉटेल आहे. हॉटेल बंद करून ते रात्री साडेबारा वाजेच्या सुमारास हॉटेल कारागीर निखिल राजेश मराठे यांच्यासह घराकडे येत होते.

नगावबारी येथील सातपुडा हायस्कूलसमोर सर्व्हीस रोडवरील गतिरोधकावर त्यांच्या दुचाकीला मागून भरधाव येणाऱ्या जीजी २७ ईएफ ८६८९ क्रमांकाच्या स्कॉर्पिओने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र मेखे यांचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाला. तर निलेश मराठे हा जखमी झाला. अपघातानंतर स्कॉर्पिओ चालक पसार झाला.



याबाबत पवन नंदकिशोर पारखे यांच्या फिर्यादीवरून स्कॉर्पिओ चालकावर देवपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ चौधरी करीत आहेत.

# नर्सिंग कॉलेजतर्फे सिकलसेल ॲनिमियाबाबत मार्गदर्शन

**प्रतिनिधी । बोराडी**

**येथील स्व. लीलाताई विश्वासराव नर्सिंग कॉलेजतर्फे आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध शाळांमध्ये सिकल सेल ॲनिमिया सप्ताह साजरा करण्यात आला.**

या उपक्रमांतर्गत इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना सिकल सेल ॲनिमिया या आजाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य प्रा. अशपाक पिंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी प्रा. दिपाली हिवराळे, प्रा. शुभदा कुलकर्णी, प्रा. वंदना पवार व प्रा. रिंकू गावित यांनी सहभाग नोंदविला. जी.एन.एम. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी फ्लॅशकाड्‌र्स व ऑडीओ व्हर्च्यूवल ॲड्‌सच्या माध्यमातून सिकल सेल ॲनिमियाबाबतमाहिती दिली. यामध्ये प्रमोद गोराने, खुशी तिरमले, रोशनी पारधी, लावण्या भदाणे तरनेहा शिरसाट यांनी उपचाराविषयी सविस्तर माहिती दिली.जी.एन.एम. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी नितेश पावरा, नयन पावरा, पनती पावरा, कविता पावरा, अंजली पाटाले, निशा पावरा, भाग्यश्री पावरा व अश्विनी पवार यांनी पोस्टर व चित्रिकरणाच्या माध्यमातून इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना आजाराविषयी मार्गदर्शन केले. हा उपक्रम उर्दू ज्युनिअर कॉलेज, शिरपूर येथे राबविण्यात आला. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. फारूक शेख, तसेच जाकीर खाटीक व बदरूल हसन उपस्थित होते.

# धुळे येथील गुरुद्वारा परिसरात कलम १४४ लागू करा

## राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस उमेश महाजन यांची मागणी

**प्रतिनिधी । धुळे**

शहरातील गुरुद्वारा परिसरात कायदा च सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिक व शीख संगतचे जबाबदार सदस्यांनी एक अत्यंत गंभीर, संवेदनशील वा जनहिताशी संबंधित विषय राष्ट्रवादी अजित पवार गट्ाचे जिल्हा सरचिटणीस उमेश महाजन यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मांडला आहे की, विश्वसनीय सूत्राद्वारे व स्थानिक पातळीवर प्राप्त माहितीनुसार, अलीकडील काळात धुळे येथील



गुरुद्वारा परिसरात बाहेरून मोठ्या संख्येने काही निहंग सिंहांना आमंत्रित करण्यात आले आहे निहंग सिंह हे त्यांच्या धार्मिक परंपरेनुसार शस्त्र धारण करतात, याचा आम्ही त्यांच्या धार्मिक अधिकार म्हणून पूर्ण आदर करतो. तथापि, सध्याच्या परिस्थितीत इतक्या मोठ्या प्रमाणावर शस्त्रधारी व्यक्तीची एकत्रित उपस्थिती असल्यामुळे परिसरात भीती. तणाव व कायदा–सुव्यवस्था बिघडण्याची तीव्र शक्यता निर्माण झाली आहे.

अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर शस्त्रधारी व्यक्तींची उपस्थिती अनधिकृत जमाव किंवा कोणतीही तणावपूर्ण स्थिती निर्माण होणे हे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेस निष्पक्षतेत व सार्वजनिक शांततेस प्रतिकूल ठरू शकते, त्यामुळे निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था राखणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच, जनहित, शांतता, निवडणुक काळातील सुव्यवस्था व संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

### निवेदनातील प्रमुख मागण्या

**गुरुद्वारा परिसर व त्याच्या आसपासच्या संवेदनशील भागात फौजदारी प्रक्रिया संहितेचे फलम १४४ तात्काळ लागू करण्यात यावे, शस्त्रांचे खुले प्रदर्शन व अनधिकृत जमाव मावर कठोर निबंध घालण्यात यावेत. निवडणूक काळ लक्षात घेता प्रशासन व पोलीस यंत्रणेमार्फत सलत व विशेष देखरेख ठेवण्यात यावी. गुरुद्वारा परिसराची मालमत्ता व्यवस्थापन व धार्मिक मर्यादा यांचे पूर्ण संरक्षण सुनिश्चित करण्यात यावे.**

# मालपुरात अवैध सावकारी विरोधात कारवाई; धाडसत्र सुरू

**प्रतिनिधी । मालपूर**

राज्यात पीडित शेतकऱ्याने थेट किडनी विकल्याच्या प्रकरणाच्या ताज्या पार्श्वभूमीवर, शिंदखेडा तालुक्यातील मालपूर गावात अवैध सावकारीविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली आहे. मिळालेल्या तक्रारीवर दखल घेऊन संबंधित पथकाने धाड टाकून खरेदीखत, सौदा पावत्या, करारपत्रे तसेच आक्षेपार्ह नोंदी असलेली डायरी जप्त केली आहे. या कारवाईमुळे मालपूर गावात अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

शिंदखेडा तालुक्यातील निबंधक कार्यालयात जगदीश वसंत भावसार यांच्याकडे अवैध सावकारीविरुद्ध तक्रार नोंदवण्यात आली होती. तक्रारीचा तपास करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली खास पथकाची नेमणूक करण्यात आली. गुरुवारी दपारी बाराच्या सुमारास मालपूर येथील भवानी नगरातील उत्तम वामन माळी व जिजाबाई माळी यांच्या घरात धाड टाकून संपूर्ण घराची झडती घेण्यात आली. यावेळी खरेदीखत, सौदा पावत्या, करारपत्रे आणि आक्षेपार्ह नोंदी असलेली डायरी पथकाने जप्त केली. याप्रकरणी पुढील सुनावणी साहाय्यक निबंधक व तालुका सावकार निबंधक यांच्या कार्यालयात पार पडेल.

## थोडक्यात

### जामनेर वाचनालयाची २७ डिसेंबरला सभा

**जामनेर ।** जामनेर येथील ओसवाल जैन भागीरथीबाई वाचनालयाची सर्वसाधारण सभा २७ रोजी होऊ घातली आहे. तब्बल ४० वर्षात प्रथमच बहुमत सिद्ध करण्याची वेळ आल्याने दोन्ही गटातर्फे सभासदांशी संपर्क केला जात आहे. अध्यक्ष जगन्नाथ लोखंडे, उपाध्यक्ष पारस ललवाणींसह आठ सदस्य विरुद्ध सचिव सुरेश धारिवाल अशी गटबाजीमुळे परस्परांविरुद्ध अविश्वास दाखल करण्यात आला आहे.

### पारोळा येथे गुणवंतांचा गौरव

**जळगाव ।** पारोळा येथील ज्येष्ठ नागरिक संघ व टायगर स्कूलतर्फे मफेसकॉममचा ४५ वा वर्धापन दिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांसह विविध क्षेत्रात उत्तुंग यश संपादन करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी कॉम्प्युटर सायन्समधून एम.टेक पदवी मिळवलेल्या शर्व पाटील, मसीएफ परीक्षा उत्तीर्ण प्रांजल नावरकर, श्रुती जैन, निशा शिरोळे, डॉ. गिरीश वडगावकर, डॉ. सोहम वैद्य, डॉ. नेहा लुनावत, अथर्वी शहा, साक्षी गुजराथी, डॉ. रोशनी अग्रवाल, डॉ. प्रिया शिरोळे, डॉ. साक्षी अमृतकर, हिमांशु पिले, पी. के. सोंजे, अनिल गुजराथी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी टायगर स्कूलचे अध्यक्ष रवींद्र पाटील, संचालिका रूपाली पाटील, उद्योजक गोपाल अग्रवाल, रोहिणी फंड, प्रा. विकास सोनवणे, प्राचार्य व्ही. एन. कोळी, प्राचार्य पी. एस. पाटील, पत्रकार अभय पाटील, विजय नावरकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## ग.स. सोसायटीच्या भरतीची स्थगिती अवघ्या २४ तासांत उठवली

### • भरतीसाठी आजपासून मुलाखतींना सुरुवात करण्यात आली

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी अर्थात गस सोसायटीच्या नोकरभरतीवरून निर्माण झालेल्या वादानंतर दि. १८ डिसेंबर रोजी जिल्हा उपनिबंधक गौतम बलसाणे यांनी पुढील आदेश येईपर्यंत भरती स्थगित ठेवण्याचे आदेश दिले होते. मात्र, संस्थेने मागविलेल्या पाच मुद्द्यांवरील माहिती सादर करताच अवघ्या २४ तासांत ही स्थगिती उठवण्यात आली असून भरती प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, आज शनिवार दि. २० पासून या भरतीसाठी मुलाखती घेतल्या जाणार आहेत.**




ग. स. सोसायटीच्या या भरतीबाबत गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात तीव्र चर्चा सुरू होती. ऑनलाईन अर्ज मागवून लेखी परीक्षा न घेता केवळ तोंडी परीक्षा घेऊन भरती करण्याचा घाट असल्याचे आरोप करण्यात आले होते. शिवसेना (शिंदे गट)चे आमदार चंद्रकांत पाटील यांनी ही भरती रद्द करण्याची अथवा नामांकित एजन्सीकडून पारदर्शक पद्धतीने घेण्याची मागणी सहकार मंत्र्यांकडे केली होती. या पार्श्वभूमीवरच जिल्हा उपनिबंधकांनी तात्पुरती स्थगिती दिली होती.

#### • पाच मुद्द्यांवर माहिती सादर

भरतीसाठी प्रस्ताव सादर करताना सभासद संख्या, सेवानिवृत्त कर्मचारी, रिक्त पदे आदी पाच मुद्द्यांवरील सविस्तर माहिती देण्याचे आदेश संस्थेला देण्यात आले होते. त्यानुसार गस सोसायटीने ही माहिती सादर केली असून ती समाधानकारक असल्याचा शेरा नोंदवत जिल्हा उपनिबंधकांनी भरतीवरील स्थगिती उठवली आहे. भरती प्रक्रिया ज्या टप्प्यावर थांबवली होती, त्याच टप्प्यापासून पुढे सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## शेंदुर्णी नगरपंचायतची आज मतमोजणी; पोलीस बंदोबस्त व विशेष सुरक्षा पथक तैनात

प्रतिनिधी । शेंदुर्णी


**शेंदुर्णी नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची मतमोजणी रविवार,दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता होणार असल्याची अधिकृत माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. १७ प्रभागांसाठी २३ बूथ वरती एकूण मतदान २०,४५३ मतदारांपैकी १४,२९५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पुरुष : १०,३५६ पैकी ७,४१० महिला : १०,०९७ पैकी ६,८८५ असे मतदान झालेले आहे.**

मतमोजणी केंद्र म्हणून गरुड महाविद्यालयाचे इनडोअर स्टेडियम येथे व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. मतमोजणी दरम्यान फक्त अधिकृत उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी तसेच नियुक्त कर्मचारी यांनाच केंद्रात प्रवेश दिला जाणार आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मतमोजणी केंद्र परिसरात पोलीस बंदोबस्त व विशेष सुरक्षा पथकांची तैनाती करण्यात येणार आहे. अनधिकृत प्रवेशास सक्त मनाई करण्यात आली आहे.

प्रत्येक प्रभागाची मतमोजणी स्वतंत्र टेबलवर करण्यात येणार असून उमेदवार प्रतिनिधींना संबंधित टेबलजवळ उपस्थित राहण्याची परवानगी असेल. मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक प्रभागाचा निकाल जाहीर केला जाणार असून अंतिम निकालाची माहिती नगरपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच अधिकृत माध्यमांतून प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

• मतमोजणी केंद्रात मोबाईल फोन, लॅपटॉप तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे नेण्यास मनाई करण्यात आली आहे. सर्व उमेदवार, प्रतिनिधी व नागरिकांनी निवडणूक नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. मतमोजणीसाठी निर्णायक अधिकारी म्हणून तहसीलदार बोदवड, सहाय्यक निवडणूक अधिकारी मुख्याधिकारी शेंदुर्णी, महसूल कर्मचारी, बांधकाम विभाग, कृषी विभागातील अधिकारी कर्मचारी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहेत.

## चिंचोलीजवळ ट्रॅक्टरची पिकअपला धडक; सिमेंट कामगार ठार



प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील चिंचोली गावाजवळ सिमेंट वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला समोरून येणाऱ्या मालवाहू पिकअप वाहनाने जोरदार धडक दिल्याने ट्रॅक्टरवरील कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी दि.१९ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे २ वाजेच्या सुमारास घडली. या अपघातात संजय नामदेव सोनवणे (वय ४०, रा. गेंदालाल मिल परिसर, जळगाव) यांचा मृत्यू झाला असून या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.**

गेंदालाल मिल परिसरात कुटुंबासह वास्तव्यास असलेले संजय सोनवणे हे मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. मालधक्क्यावरून सिमेंटच्या गोण्या वाहतूक करण्याचे काम ते नियमितपणे करीत होते. नेहमीप्रमाणे शुक्रवारी सकाळी ते इतर मजुरांसह ट्रॅक्टर (क्र. एमएच १९ बीजी ६०७८) द्वारे सिमेंटच्या गोण्या भरून चिंचोली गावाकडे गेले होते.

सिमेंट उतरवून जळगावकडे परत येत असताना चिंचोलीजवळ समोरून येणाऱ्या मालवाहू पिकअप वाहनाने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. या धडकेत संजय सोनवणे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. या अपघातामुळे सोनवणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## फुकट्या प्रवाशांकडून ५९ कोटींचा दंड वसूल

प्रतिनिधी । भुसावळ

मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात अनधिकृत व विनातिकीट प्रवास करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जात आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये एप्रिल ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत भुसावळ विभागात ६ लाख २४ हजार विनातिकीट, अयोग्य अथवा अवैध प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून तब्बल ५९ कोटी २५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

## संविधानाने प्रत्येकास न्याय, समानता व संधीचे दिले अधिकार : अ‍ॅड.काळे

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**विविध जाती, धर्म, पंथ असलेल्या भारत देशातील प्रत्येकास महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जगातील सर्वात सुंदर व सर्वात मोठ्या लिखित संविधानाने न्याय, समानता व संधी देण्याचे महान काम करून देशात क्रांती घडवून आणली असल्याचे प्रतिपादन अ‍ॅड. देविदास काळे यांनी मुक्ताईनगर येथे संविधान सन्मान साप्ताहच्या आयोजित कार्यक्रमाच्या प्रसंगी बोलतांना केले.**

अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेतर्फे संविधान सन्मान सप्ताह निमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी मुक्ताईनगर तालुका वकील संघाचे माजी तालुकाध्यक्ष तथा अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेचे तालुकाध्यक्ष म्हणून अ‍ॅड. काळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरकारी वकील अ‍ॅड. संतोष कलंत्री हे होते.

याप्रसंगी अ‍ॅड.उल्हास पाटील, अ‍ॅड. संतोष कोळी , अ‍ॅड. देवेंद्र बोदडे यांनीही भारतीय संविधान हा सर्वात श्रेष्ठ असा राष्ट्रग्रंथ असून प्रत्येकाच्या घरात संविधान असावे. तसेच भारतीय राज्यघटनेचे भागवत सप्ताहसारखे संविधान सन्मान सप्ताह सोहळे साजरे झाले पाहिजेत. असे सांगत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार थोर कायदेपंडित महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्वांना समानता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय मिळवून देऊन देशात क्रांती घडवून आणली आहे..

## • निधन वार्ता

### केवळबाई पाटील



**धानवड ।** येथील केवळबाई नाटू पाटील ( वर्ष ९०) यांचे निधन त्यांच्या पाश्चात दोन मुले, तीन मुली तसेच नातवंडे असा परिवार आहे. त्या जितेंद्र पाटील व गोरख पाटील यांच्या मातोश्री होत.

## तत्काळ तिकीट बुकिंगमध्ये ओटीपी प्रणाली सुरू

प्रतिनिधी । भुसावळ

तत्काळ तिकिट बुकिंग प्रणालीत पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि खऱ्या प्रवाशांनाच तिकिट मिळावे यासाठी भारतीय रेल्वेने ओटीपी (वन टाइम पासवर्ड) आधारित प्रमाणीकरण प्रणाली टप्प्याटप्प्याने लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मध्य रेल्वेच्या आणखी पाच गाड्यांमध्ये दि. १९ डिसेंबरपासून ही प्रणाली लागू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे तत्काळ तिकिट विक्रीत होणारा काळाबाजार थांबण्यास मोठी मदत होणार आहे.

पीआरएस या नव्या प्रणालीनुसार संगणकीकृत काउंटर, अधिकृत एजंट तसेच आयआरसीटीसीची वेबसाइट व मोबाइल अ‍ॅपद्वारे होणाऱ्या तत्काळ तिकिट बुकिंगसाठी ओटीपी प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. बुकिंग दरम्यान प्रवाशाने नोंदवलेल्या मोबाइल क्रमांकावर एकदाच वापरता येणारा ओटीपी पाठवण्यात येईल. हा ओटीपी यशस्वीरीत्या पडताळल्यानंतरच तत्काळ तिकिट जारी करण्यात येणार आहे. रेल्वे प्रशासनाच्या मते, या प्रणालीमुळे एजंटमार्फत होणारा गैरव्यवहार व तिकिटांचा काळाबाजार मोठ्या प्रमाणात कमी होईल. तसेच प्रत्यक्ष प्रवाशांनाच तिकिट मिळण्याची शक्यता वाढणार आहे. तत्काळ तिकिट काढताना प्रवाशांनी आपला मोबाइल फोन जवळ ठेवणे आवश्यक राहणार आहे. तत्काळ तिकिट नोंदणी करताना प्रवाशाचा मोबाइल क्रमांक सक्रिय असणे अत्यावश्यक आहे. ओटीपी प्राप्त न झाल्यास तिकिट बुकिंग प्रक्रिया पूर्ण होणार नाही. या नव्या व्यवस्थेमुळे तिकिट नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## अमळनेरात ९ हजार ८२० रुपयांचा नायलॉन मांजा जप्त

प्रतिनिधी । अमळनेर

**शहरातील शाह आलम नगर भागात पोलिसांनी छापा टाकून ९ हजार ८२० रुपयांचा २७ बंडल नायलॉन मांजा पकडला. पतंगाच्या नायलॉन दोऱ्याने आतापर्यंत अनेकांचे प्राण गेले असून, जनावरे, पक्ष्यांसाठी हा मांजा धोकादायक ठरला आहे. शासनाने नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले होते.**

गुरुवारी १८ रोजी सायंकाळी शाह आलम नगरमध्ये नायलॉन मांजा विक्री होत असल्याची माहिती पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना मिळाली. त्यावरून हवालदार विनोद सोनवणे, सुनील तेली, मयूर पाटील, नम्रता जरे यांना कारवाईसाठी पाठविले. जिलानी किराणाच्या बाजूला अब्दुल रहीम अन्सारी नायलॉन मांजा विक्री करताना आढळून आला. त्याच्याजवळून ६ हजार ३०० रुपयांचे ९ बंडल, ३ हजार रुपयांचे ५ बंडल, ५२० रुपयांचे बंडल, असे एकूण ९ हजार ८२० रुपयांचे २७ बंडल पकडले. अन्सारीविरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ५, १५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, हवालदार प्रमोद पाटील तपास करीत आहेत.



## सावद्यातील आठवडे बाजार सोमवारी

प्रतिनिधी । सावदा

सावदा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चया मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर सावदा शहरात दर रविवारी भरणारा साप्ताहिक आठवडे बाजार एक दिवस पुढे ढकलण्यात आला आहे. दि. २१ डिसेंबर २०२५ (रविवार) रोजी होणाऱ्या मतमोजणीच्या दिवशी शहरातील कायदा-सुव्यवस्था व प्रशासकीय सोयी लक्षात घेता, हा आठवडे बाजार दि. २२ डिसेंबर (सोमवार) रोजी भरविण्यात येणार आहे.

## गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

प्रतिनिधी । भुसावळ

**श्री शिवाजी छात्रालय संचालित राजर्षी श्री गाडगेबाबा माध्यमिक विद्यालय, भुसावळ येथे शनिवार दि. २० डिसेंबर रोजी स.१० वाजता थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष भैय्यासाहेब ओगले हे होते. कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी गाडगेबाबांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर केली. यावेळी नितीन ओव्हाळ यांनी गाडगेबाबांच्या जीवनातील प्रेरणादायी घटनांची सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात भैय्यासाहेब ओगले यांनी स्वच्छता आणि शिक्षण या विषयांचे महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांना समाजोपयोगी कार्यासाठी प्रेरित केले. सूत्रसंचालन प्रेरणा मालुंजकर यांनी प्रभावीपणे केले. या कार्यक्रमास प्राथमिक मुख्याध्यापिका लीना वानखेडे , मुख्याध्यापक के. आय. पाटील, उपस्थित होते.



## महात्मा गांधी विद्यालयाचा गुजरातमध्ये होणार गौरव

### • अहमदाबाद येथे १९व्या राष्ट्रीय स्तरावरील गणित महोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी । वरणगाव

**गुजरातमधील अहमदाबाद येथील सायन्स सिटी येथे एकोणिसाव्या राष्ट्रीय स्तरावरील गणित महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित महोत्सवात देशभरातील दहा निवडक शाळांमध्ये महात्मा गांधी विद्यालयाची निवड झाली असून या शाळांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.**



महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी राष्ट्रीय स्तरावरील गणित महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी हा महोत्सव २० ते २२ डिसेंबर दरम्यान अहमदाबाद सायन्स सिटी येथे होणार आहे. या महोत्सवात देशातील २५ राज्यांमधून विद्यार्थी सहभागी होणार असून विद्यार्थ्यांसाठी मॅथ मॉडेल, मॅथ पझल, मॅथ क्विझ, मॅथ रिले, मॅथ पोएम, मॅथ एसे यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी महात्मा गांधी विद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये प्रज्वल पाटील, सिद्धांत तायडे, सांकेत पांढरे, साहिल झोपे, मानस पाटील आणि मनीष माळी यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षक एस. आर. मोरे व सुनील वानखेडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे संस्थेच्या चेअरमन वंदना पाटील, प्राचार्य सी. जे. तायडे, उपमुख्याध्यापक बी. एम. राठोड तसेच पर्यवेक्षक डी. आर. कोळंबे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## भुसावळात भरदिवसा घरफोडी; ८७ हजारांचे दागिने लंपास

प्रतिनिधी । भुसावळ

शहरातील जुना सातारा भागातील राम मंदिराजवळ असलेल्या एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ८७ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी भुसावळ शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महेंद्र शरद पाटील (५२, रा. जुना सातारा, भुसावळ) हे दि. ५ डिसेंबर रोजी कामानिमित्त सोलापूर येथे गेले होते. त्यांचे घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील हॉलमध्ये असलेल्या कपाटाचे लॉकर तोडून त्यातील सोन्याचे दागिने चोरून नेले. दि. १९ डिसेंबर रोजी चोरीचा हा प्रकार उघडकीस आला.